**A Lecture and Open Discussion on " Psychoanalysis on Feminism "**

**Date: 12 Feb 2014**
**Time: 11:00 am**
**Venue: Dept of Economics**

नॅक अ दर्जा प्राप्त

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

# ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

**द्वारा आयोजित**

# विशेष व्याख्यान व मुक्तसंवाद

## विषय: "मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद"

**"Psychoanalysis & Feminism"**

**प्रमुख वक्ते:**

प्रा. डॉ. विलास पाध्ये
सहयोगी प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

**विनीत :**

संचालक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र.

बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०१४
वेळ: स.११:०० वाजता
स्थळ : अर्थशास्त्र सभागृह क्रं.२

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

## ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्र

---

**डॉ. सिग्मंड फ्रॉईड् स्त्रीच्या लैंगिकतेविषयी विस्तृत चर्चा करणारे आधूनिक काळातील पहिले विचारवंत – प्रा. डॉ. विलास पाध्ये**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्राच्या वतीने **मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद** या विषयावर प्रा.डॉ. विलास पाध्ये (सहयोगी प्राध्यापक, मानसशास्त्र विभाग, शासकीय ज्ञान-विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद) यांच्या विशेष व्याख्यान व मुक्तसंवादाचे (दि.१२) आयोजन करण्यात आले होते.

मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद या विषयाची मांडणी करतांना डॉ. पाध्ये म्हणाले की, डॉ. सिग्मंड फ्रॉईड् हे स्त्रीच्या लैंगिकतेविषयी विस्तृत चर्चा करणारे आधूनिक काळातील पहिले विचारवंत होते, त्यांनी या चर्चेद्वारे स्त्रीवादाला एक नवी दिशा दिली. वयाच्या तीसऱ्या ते सातव्या वर्षादरम्यान शिश्न अवस्था असते व याच अवस्थेत मुलांमध्ये 'उडीपस' आणि मुलींमध्ये 'इलेक्ट्रा' गंड निर्माण होतात. या अवस्थेतील शिश्नइर्षा व त्याचा मुलींच्या मनावर होणारा परिणाम तसेच कॅरेन हॉर्नी व नॅन्सी चोडोरो या स्त्रीवाद्यांनी या बाबत केलेली टिका यावर डॉ. पाध्ये यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.

मुक्तसंवादाच्या सत्रामध्ये मांडणी करताना प्रा. ललित भवरे यांनी शूलामिथ फायरस्टोन यांचा दाखला देत ते म्हणाले की, 'फ्रॉईड्ने लैंगिकतेवरील चर्चांची सुरुवात केली हे त्यांचे महत्वाचे योगदान होय. वस्तुत: स्त्रिया आणि मुलींमध्ये नसणारे शिश्न हे सत्तेचे प्रतिक न मानता स्त्रियांच्या इच्छांचे लक्ष्य मानले. कुटुंबव्यवस्थेतील सत्तेमध्ये असणाऱ्या उतरंडीकडे फ्रॉईड्ने असंवेदनशील पद्धतीने पाहिले.' म्हणून फ्रॉईड् यांच्यावर शुलामिथ फायरस्टोन यांनी केलेल्या टिकेचा संदर्भ प्रा. भवरे यांनी दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सविता बहिरट यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. ललित भवरे यांनी केले. यावेळी विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

DIRECTOR
Tarabai Shinde Women's Studies Centre
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

-जनसंपर्क अधिकारी

Psychoanalysis & Feminism [12.02.2014]





## स्त्री अभ्यास केंद्रातर्फे आज व्याख्यान

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यास केंद्रातर्फे मानसशास्त्रज्ञ डॉ. विलास पाध्ये यांचे १२ फेब्रुवारी रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. डॉ. पाध्ये यांचे 'मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद' या विषयावर व्याख्यान होईल. अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात बुधवारी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम होणार आहे.

दै. सामना दि. १२-०२-२०१४

सारांश

## स्त्री अभ्यास केंद्रातर्फे आज व्याख्यान

औरंगाबाद : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील ताराबाई शिंदे स्त्री अभ्यासकेंद्रातर्फे मानसशास्त्रज्ञ डॉ. विलास पाध्ये यांचे १२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. अर्थशास्त्र विभागाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता डॉ. पाध्ये 'मनोविश्लेषण आणि स्त्रीवाद' या विषयावर व्याख्यान देतील.

दै. लोकमत दि. १२-०२-२०१४

## डॉ. पाध्ये यांचे आज व्याख्यान

औरंगाबाद | विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रातर्फे मानसशास्त्रज्ञ डॉ. विलास पाध्ये यांचे बुधवारी सकाळी ११ वाजता अर्थशास्त्र विभागात व्याखान होणार आहे.

दै. दिव्य मराठी दि. १२-०२-२०१४